| MHAH180017322024 | | | |
|---|---|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख | : | ०९/०७/२०२४ |
| | प्रकरण नोंद तारीख | : | १०/०७/२०२४ |
| | निकालाची तारीख | : | ०९/०३/२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०१ ०७ ३० |

**(भाग–अ)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, राहुरी यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी: पी. एच. पाटील)

| **नियमित फौजदारी खटला क्र.३८२/२०२४** | **निशाणी क्र. ३१** |
|---|---|

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>राहुरी पोलीस ठाणे,<br>राहुरी, जि. अहमदनगर |
| **प्रतिनिधित्व** | : | श्री. आर. के. गागरे<br>सहा. सरकारी अभियोक्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| आरोपी | : | **१. सुनिल विष्णु म्हसे**<br>वय: ४४ वर्षे, व्यवसाय: शेती<br>**२. सतिष विष्णु म्हसे**<br>वय: ३८ वर्षे, व्यवसाय: शेती<br>**३. सिध्दार्थ सुनिल म्हसे**<br>वय: १९, व्यवसाय: शेती<br>रा. शिलेगाव, ता. राहुरी, जि. अ.नगर. |

| | | |
|---|---|---|
| **प्रतिनिधित्व** | : | आरोपी करीता विधीज्ञ श्री. बी. एस. बाचकर |

## (भाग–ब)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दिनांक | : | १८/०५/२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | : | १९/०५/२०२४ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | : | ०९/०७/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ०८/०८/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | : | १७/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक | : | ०९/०३/२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक/ फो.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे नोटीस | जामिनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली अथवा मुक्त केले | काय शिक्षा दिली | फो. प्र. सं. कलम ४२८ प्रमाणे आरोपीचा कारागृहातील कालावधी वजावट होण्यास पात्र आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल विष्णु म्हसे | २७/०५/ २०२४ | ०८/०८/ २०२५ | भा.दं.वी कलम ३५४,३२३ ,५०४,५० ६,३४ प्रमाणे | आरोपीं ना निर्दोष सोडले. | लागू नाही. | लागू नाही. |
| २. | सतिष विष्णु म्हसे | -//- | -//- | -//- | -//- | -// - | -//- |
| ३. | सिध्दार्थ सुनिल म्हसे | -//- | -//- | -//- | -//- | -// - | -//- |

**न्यायनिर्णय**

(दि.०९/०३/२०२६ रोजी जाहीर)

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे :**

फिर्यादी कल्पना नितिन म्हसे ह्या शिलेगाव, करपारावाडी, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथील रहिवासी आहेत. त्यांची शिलेगाव शिवारात गट नं. २०५ ही शेतजमीन असून आरोपींची शेतजमीन त्यांच्या शेतीच्या बाजूला आहे. घटना ही दि. १८/०५/२०२४ रोजी सायं. ०६.३० च्या सुमारास फिर्यादीच्या शेतात घडली. फिर्यादीचे पती शेतात काम करीत असताना फिर्यादी त्यांना पिण्याचे पाणी घेवून गेल्या. त्यांच्या शेतीच्या शेजारी आरोपी यांचे शेत आहे तेथे आरोपी क्र. १ ते ४ हे त्यांच्या शेतात मका कापत असताना त्यांनी फिर्यादी व त्यांच्या पतीला जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ केली. तेव्हा फिर्यादी त्यांना म्हणाल्या 'आपले कोर्टात वाद चालु आहे तुम्ही विनाकारण शिवीगाळ करू नका' त्यानंतर आरोपी क्र. १ व २ हे शिवीगाळ करत धावून आले व फिर्यादीला धक्काबुक्की करून आरोपी क्र. २

याने फिर्यादीच्या साडीचा पदर ओढला व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा उजवा हात पिरगाळून छातीवर बुक्क्या मारून खाली पाडले व त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच फिर्यादीला व त्यांच्या पतीला जीवेठार मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद आरोपीविरुध्द दाखल केली आहे.

२. सदर फिर्यादच्या अनुषंगाने आरोपीविरूद्ध गुन्हा क्र. ५९३/२०२४ भारतीय दंड विधान कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे (*यापुढे भा.दं.वी असे संबोधण्यात येते*) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास राहुरी पोलीस ठाण्याचे सहा. फौज. इ. बी. आव्हाड यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जवाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केले आणि तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपींविरुध्द भा.दं.वी कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे **निशाणी १३** वर आरोपींवर दोषरोप ठेवले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला चालविण्याची मागणी केली.

४. प्रस्तुत आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले. त्यानंतर उभय पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता, खालील मुद्दे खटल्याच्या निर्णयार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबित केले आहे का की, दि.१८/०५/२०२४ रोजी सायं. ०६.३० च्या सुमारास मौजे शिलेगाव शिवार, ता. राहुरी येथे गट क्र. २०५ मध्ये तुम्ही संगनमताने आरोपी क्र. २ याने फिर्यादीच्या साडीचा पदर ओढला तसेच तुम्ही आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा हात पिरगळून छातीवर बुक्क्या मारून खाली पाडले व फिर्यादीस लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले व त्याव्दारे भा.दं.वि. **कलम ३५४ सह कलम ३४** अन्वये अपराध केला? | ..नाही |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबित केले आहे का की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारास शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली व त्याव्दारे भा.दं.वि. कलम **३२३ सह कलम ३४** अन्वये अपराध केला? | ..नाही |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबित केले आहे का की, आरोपींनी वर नमुद वेळ, तारीख व ठिकाणी तुम्ही संगनमताने फिर्यादीला उद्देशपूर्वक शिवीगाळ करून अपमान करून त्यायोगे त्यास प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपीचा उद्देश होता व त्याद्वारे भा.दं.वी.चे **कलम ५०४ सह कलम ३४** अन्वये अपराध केला? | ..नाही |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबित केले आहे का की, आरोपींनी वर नमुद वेळी व ठिकाणी आपसात संगनमताने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन धाकदपटशहा केला व त्याव्दारे भा.दं.वि. **कलम ५०६ सह कलम ३४** अन्वये अपराध केला? | ..नाही |

| | | |
|---|---|---|
| ५. | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## –कारणमिमांसा–

६. अभियोगपक्षाने परिशिष्ट ''अ'' मध्ये दर्शविल्याप्रमाणे १ साक्षीदार तपासला. त्यानंतर फिर्यादीने **निशाणी क्र. २५** वर पुरसीस देऊन त्यांना अधिकचा पुरावा देणार नसल्याचे सांगीतले त्यामुळे **निशाणी क्र. ३०** वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दे क्र.१ ते ४ बाबत:**

७. सदरचे वाद प्रश्न एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांचे निष्कर्ष एकाच पुराव्याच्या संचावर आधारीत असल्याने पुरावा व चर्चेतील तोच तोपणा टाळण्यासाठी ते विचाराच्या एकत्रीत घेण्यात आले आहेत.

८. आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपी व फिर्यादी यांच्यात वाद होवून, फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले तसेच फिर्यादीचा हात पिरगळून धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. त्यामुळे भारतीय दंड सहिंता कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केला हे अभियोग पक्षाने नि:संयशपणे शाबीत करणे आवश्यक आहे.

९. अभियोग पक्षाने गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षीदार क्र.१ कल्पना नितीन म्हसे **निशाणी क्र.२६** वर तपासले आहे. त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, त्या आरोपीला ओळखतात. आरोपी फिर्यादीच्या शेजारी राहतात. घटना ही सन २०२४ मध्ये घडली. घटनेच्या वेळी आरोपी व फिर्यादी यांची किरकोळ बाचाबाची

झाली होती. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरूद्ध फिर्याद दिली. फिर्यादी यांनी अभियोग पक्षास उपयुक्त अशी साक्ष दिली नाही, म्हणून सरकारी पक्षाने न्यायालयाची परवानगी घेवून साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारले असता, त्यामधून सरकारी पक्षाचे कथनाला मदत करणारा असा कोणताही पूरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, फिर्यादी यांना अभियोग पक्षातर्फे सूचक प्रश्न विचारले असता फिर्यादी मधील मजकूर पूर्णपणे नाकारले आहे. आरोपीने घटनास्थळ व वैद्यकीय प्रमाणपत्र हे मान्य केले असले तरी, घटनास्थळ व वैद्यकीय प्रमाणपत्र यासारख्या दुय्यम पुराव्यास महत्त्व देणे योग्य होणार नाही. फिर्यादीने आरोपीचा गुन्ह्यात सहभाग होता यावर देखील पुराव्यात कोठेही कथन केलेले नाही. याशिवाय त्यांची आपसात तडजोड **नि.२५** झाली आहे व फिर्यादी यांनी ज्यादा पुरावा देण्याचा नसल्याबाबत न्यायालयात **नि.३०** पुरसिस दाखल केली आहे.

१०. एकंदरीत पुराव्यावरुन असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपी यांची तडजोड **नि.२५** वर झाली असल्यामुळे फिर्यादी व साक्षीदार हे अभियोगपक्षाला समर्थन करत नाही. अशा परिस्थीतीमध्ये वाद होवून आरोपीने मारहाण केली व शिवीगाळ केली. या सर्व बाबी शाबीत करणेकरीता कोणताही सबळ, थेट किंवा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान कलम, १८६० चे कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केल्याचे संशयाचे पलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे मुद्दे क्र.१ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

११. फिर्यादीच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता त्यांनी परस्पर विरोधी कथन केल्याचे दिसुन येते त्यामुळे सदर साक्षीदाराने न्यायालयासमोर खोटा पुरावा दिल्याच्या विरूध्द खोटी साक्ष दिल्याच्या (परज्युरी) या अपराधासाठी

त्यांच्याविरूध्द कारवाई करणे न्यायोचित ठरते परंतु अभिलेखावरून व फिर्यादीच्या व साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यावरून असे दिसुन येते की, आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये तडजोड **नि.३०** झाल्याने त्यांनी सदरील परस्पर विरोधी वक्तव्य केलेले आहे म्हणुन फिर्यादी विरूध्द कारवाई करणे अनिवार्य वाटत नाही.

**मुद्दा क्र.५ बाबत:**

१२. उपरोक्त मुद्दे क्र.१ ते ४ च्या निष्कर्षानंतर असे सिध्द होते की, अभियोग पक्ष आरोपींविरुध्द त्यांच्यावर ठेवण्यात आलेले गुन्हे साबित करू शकला नाही. त्यामुळे, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **१. सुनिल विष्णु म्हसे, २. सतिष विष्णु म्हसे, ३. सिध्दार्थ सुनिल म्हसे** रा. शिलेगाव शिवार, ता. राहुरी, जि. अहमदनगर *यांची* फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८ (१) नुसार भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये या गुन्ह्यांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जामिनबंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तीक बंधपत्र द्यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.03.10 10:53:38 +0530

ठिकाण: राहुरी
दिनांक: ०९/०३/२०२६

**(पी. एच. पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, राहुरी

**“परिशिष्ट– अ”**

**(भाग–क)**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| **सा.क्र.** | **साक्षीदारांचे नाव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | कल्पना नितीन म्हसे | फिर्यादी | २६ |

**क. सरकार/ आरोपी/ न्यायालयाच्या निशाणींची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १. | नि. क्र. २७ | फिर्यादीची सही |
| २. | नि. पी. १ | फिर्याद |

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.03.10 10:53:27 +0530

राहुरी

दिनांक: ०९/०३/२०२६

**(पी. एच. पाटील)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.२, राहुरी.

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करते की, पी.डी.एफ.करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

लघुलेखकाचे नाव : कु. एस. एस. गायकवाड

न्यायालयाचे नाव : न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, राहुरी.

न्यायनिर्णयाची तारीख : ०९/०३/२०२६

न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख: ०९/०३/२०२६

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख : ०९/०३/२०२६